Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

| VOL- XI | ISSUE- III | MARCH | 2024 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 8.02 | ISSN 2349-638x |
|---|---|---|---|---|---|---|

# अच्युत गोडबोले यांची शैक्षणिक आणि समाजिक विचारसरणी

**राधेशाम नंदकिशोर कुमठेकर**
संशोधक विद्यार्थी, शिक्षणशास्त्र संकुल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
विष्णुपुरी, नांदेड (महाराष्ट्र)
Email : radhe9823@gmail.com

**गोरोबा तुकाराम खुरपे**
मार्गदर्शक तथा प्रोफेसर
महात्मा फुले अध्यापक महाविद्यालय,
जळकोट जि. लातूर(महाराष्ट्र)
Email : gtkhurpe@gmail.com

**प्रस्तावना :**

शिक्षण प्रक्रियेचा मुख्य आत्मा हा त्या शिक्षण प्रक्रियेतील अभ्यासक्रम असतो. अभ्यासक्रमाच्या माध्यमातून आपल्या समाजाच्या, देशाच्या सर्वांगिण विकासासाठी आवश्यक असणारी सुपीक व सकारात्मक मेंदूची पिढी विकसित करण्याचे क्षमता असते म्हणून अभ्यासक्रम हा आपल्या शिक्षण व्यवस्थेचा मुख्य पाया आहे. जितकेही अभ्यासक्रम विद्यापीठाच्या माध्यमातून निश्चित केले जातात, त्याच्या पाठीमागे विशिष्ट पद्धतीची भूमिका असते किंबहुना या पाठ्यक्रमाच्या माध्यमातून आपल्याला विशिष्ट पद्धतीचे कौशल्य गुण असणारे युवक आपणास हवे आहेत म्हणून त्या अभ्यासक्रमाची जाणीवपूर्वक विशिष्ट पद्धतीने रचना केलेली असते म्हणजेच शिक्षण प्रक्रियेमधील अभ्यासक्रम हा एक असा मूलभूत घटक आहे की, तो त्या घटकाच्या आधारे आपणास आवश्यक असणारे मनुष्यबळ, बुद्धिमत्ता, कौशल्य गुण, बौद्धिकता आपल्या मागणीनुसार आपल्या गरजेनुसार आपण त्यांच्या मेंदूला त्या पद्धतीने तयार करत असतो. समाजाच्या जडणघडणीत साहित्य निर्मितीचा मोठ्या प्रमाणात परिणाम होत असतो व पर्यायाने त्याचा परिणाम शिक्षणावर देखील होत असतात. उत्कृष्ट साहित्यातून एक उत्कृष्ट समाज निर्मिती होण्यास मदत होत असते. या संपूर्ण साहित्याचा परिणाम शिक्षण क्षेत्रावर दूरगामी स्वरूपात होत असतो अर्थात अभ्यासक्रम किती महत्त्वपूर्ण आहे यांची प्रचिती पुढील विधानावरून निश्चित येईल-

" A good School system provides a good Society
and
a good Society provides a good School system
but both depends on a good Curriculum."

उदा. एखाद्या दहशतवाद्याला त्या पद्धतीचं शिक्षण देत असताना अन्याय अत्याचार करण्याची वृत्ती वाढीस लागणारा अभ्यासक्रम शिकवला जात असेल, तर त्यातून निश्चितच एक क्रूर असा दहशतवादी निर्माण होत असतो. या उलट परिस्थितीमध्ये जर आपण एखाद्या शिक्षण व्यवस्थेमध्ये, अभ्यासक्रमामध्ये मानवतावादी, अहिंसेची तत्त्वज्ञान शिकवण्यास सुरुवात केली तसेच तशा पद्धतीचा अभ्यासक्रम निश्चित केला तर निश्चितपणे एक तत्त्वज्ञानी व्यक्ती, एक अहिंसावादी व्यक्ती त्या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून निर्माण होते अर्थात त्या व्यक्तीचं व्यक्तिमत्व त्या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून अहिंसावादी पद्धतीच जोपासले जाते.

साधारणपणे अभ्यासक्रम तयार करत असताना त्यात कोणते घटक समाविष्ट करावयचे आहेत?, अभ्यासक्रमातून आपणास काय फलित साध्य करायचा आहे?, समाजावर कोणत्या प्रकारची संस्कार करायचे आहेत?, शिक्षणाची दिशा कोणत्या दिशेने घेऊन जायची आहे? अशा असंख्य प्रश्नांची उकल करून त्या - त्या वर्गाचा पाठ्यक्रम हा निश्चित केला जातो. अभ्यासक्रमातील घटक निवडत असताना, प्रामुख्याने कला शाखेतील अभ्यासक्रम तयार करत असताना समाजातील जे अनेक साहित्यिक आहेत, साहित्य क्षेत्रातील जे नामवंत श्रेष्ठ मंडळी आहेत, यांच्या साहित्याचा समावेश त्याच्यामध्ये केलेला असतो. म्हणजेच उत्तम साहित्य हे

शिक्षण प्रक्रियेला आणि समाजाला दिशा देणारे प्रभावी असे माध्यम आहे.

**अच्युत गोडबोले यांची शैक्षणिक आणि सामाजिक विचारसरणी :**

कोणतीही साहित्य हे विद्यार्थी व संशोधक मंडळी व समाजाच्या वाचकाच्या दृष्टिकोनातून अत्यंत उपयुक्त असते. अलीकडच्या कालखंडामध्ये जरी आपण डिजिटल स्वरूपातील पुस्तके वाचली जात असतील आपण ते वापरत असू तरीही साहित्यातील एखादं पुस्तक आपण जेव्हा हातात घेऊन वाचतो ती भूमिका तो आनंद हा एक वेगळ्याच प्रकारचा असतो. यासाठी येथे एक उदाहरण आपणास देता येऊ शकेल अच्युत गोडबोलेयांच्या 'बखर संगणकाची' या ग्रंथाचा आपण जेव्हा अभ्यास करतो वाचन करतो त्यावेळेस संगणक निर्मितीच्या प्रक्रियेपासून ते गणितातील 'अबॅकस' याचा वापर त्याची निर्मिती पासून ते '**ॲमेझॉन**' खोऱ्यापर्यंत संगणकातील विविध छोट्या छोट्या सिलिकॉन व्हॅलीपर्यंत आणि फेसबुक, गुगल, ऑर्कुट या सर्व प्रकारच्या निर्मितीपर्यंतचा सर्वच इतिहासाची ते इत्यंभूत मांडणी त्यामध्ये आपणास आढळून येते या सर्व गोष्टींचा समावेश आहे. अच्युत गोडबोले यांचे सर्वच ग्रंथ हे अत्यंत वाचनीय व माहिती संपन्न आहेत, थोड्या वेळासाठी आपण ते पुस्तक वाचत असताना संपूर्णपणे त्या पुस्तकांमध्ये बुडून जातो. आपण एक ज्ञानाची सफर केली आहे अशी भावना निर्माण होते ही वाचकासाठी आणि सामाजिक विकासासाठी अत्यंत उपयुक्त तसेच महत्त्वपूर्ण असते. नवप्रवर्तन घडवून आणणे हा मानवी उत्क्रांतीचा प्रमुख पाया असून यावरच समाजाची उभारणी केली जाते. निश्चितच कोणतीही गोष्ट नव्याने निर्माण करण्यासाठी आवश्यक असणारे वातावरण, संसाधने याच्या उपलब्धतेवर आणि सर्वात महत्त्वाचं व्यक्तीच्या कुतहलावर नवप्रवर्तन अवलंबून असते. जगातील कोणताही शोध तसेच नाविन्यपूर्ण उपक्रमाचा शोध हा मानवी कुतूहलातून निर्माण झालेला आहे, कुतूहलातूनच शिक्षण होत असते, नविन गोष्टी शिकता येतात आणि ही कुतूहल विकसित करण्याची क्षमता, कुतूहल याची उपयुक्तता शैक्षणिक, सामाजिक आणि देशाच्या सामर्थ्याच्या प्रगतीच्या दृष्टिकोनातून किती उपयुक्त आहे हे अच्युत गोडबोले यांच्या साहित्यातून प्रकर्षाने वाचकाच्या समोर येतात.

अच्युत गोडबोले यांनी प्रदीर्घ लेखनातून उत्तम प्रकारच्या साहित्याची निर्मिती केलेली आहे. त्यांच्या साहित्यात अनेकविध दृष्टीकोन आहेत, त्यातील केवळ शैक्षणिक आणि सामाजिक विचारसरणीचा विचार येथे करण्यात आलेला आहे. अच्युत गोडबोले यांचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनात विविध बाबी दिसून येतात त्यातील काही प्रमुख बाबी पुढीलप्रमाणे –

**१. मानवता :**

सद्य:स्थितीत सातत्याने पैसा, प्रसिद्धी आणि मी पुढे कसा जाईल यावर अधिक भर दिला जात आहे यातून समाजाच्या प्रचंड अपेक्षा वाढवत चालल्या आहे. प्रत्यक्षात अपेक्षा आणि वास्तविकता यातील फरकावरच आनंद अवलंबून असतो हे समजून घेत जीवन जगले पाहिजे असे मत अच्युत गोडबोले यांनी आपल्या लेखनातून मांडले आहे. अच्युत गोडबोले यांच्या मते, सिनेमा आणि टीव्हीवर आपले आदर्श कोण आहेत तर सिनेमा, सिरियल, जाहिरातीमधल्या अभिनेते-अभिनेत्र्या परंतु यापेक्षा चांगले आर्किटेक्ट, गणिततज्ज्ञ, वैज्ञानिक, शिक्षक, कृषितज्ज्ञ, कॉस्मालॉजिस्ट, स्पेस रिसर्च करणारे, चित्रकार, आदर्श सामाजिक कार्यकर्ते यांच्या किती मुलाखती आपण बघितल्या आहेत याचे आत्मपरीक्षण समाजातील घटकांनी केले पाहिजे. आज माणूस दुसऱ्यांशी तुलना करत असून यामुळे अस्वस्थ राहत आहे, स्वत:चे मूल्यमापन करताना मला किती लोक मानतात? माझ्याबद्दल काय म्हणतात? याचा विचार करत आहेत. प्रत्यक्षात कितीही आणि काहीही मिळवलं तरी दुसरा कुणीतरी वरचढ आढळलेला असतोच मात्र यामुळे अस्वस्थ न होता आपण आपले अधिकचे प्रयत्न करत राहावे, जास्तीत जास्त शिकत राहावे, शिक्षणातून मानवता विकसित होते आणि समाज जीवनात मानवतेवर प्रेम करावे आणि माझ्यामुळे इतरांचे कसे बरे होईल याकडे लक्ष द्यावे त्यातच खरा आनंद असतो.

**२. समानता :**

सध्याची परिस्थिती अशी आहे की, मुलांची ध्येयं वगैरे ठरलेली असतात. आपण पुढे नक्की काय करायचं, हे त्यांना माहीत असतं. आपण अमुकच व्हायचं वगैरे त्यांचं स्वप्न असतं. मात्र अशा मुलाचं प्रमाण खूप कमी आहे तर मोठ्या हॉटेल्समध्ये नाश्ता वगैरे करताना खूप पद्धतशीर त्या नाश्त्याची मांडणी केलेली असते. अशा आकर्षक मांडणीचा

फोटो काढून सोसिअल मेडियावर टाकण किंवा एखादी कविता करून फेसबुकवर टाकून त्याला किती लाईक्स मिळाल्या हे पाहणे व कमी लाईक्स मिळाल्या तर नाराज होणे हे योग्य नव्हे कारण यात वेळ खूप वाया जातो आणि याचा परिणाम संत गतीने अभ्यासावर अर्थात करिअर होतो यासाठी वेळेचा सदुपयोग करावा आणि आपल्या ध्येयाकडे डोळेझाक करू नये असाच सल्ला अच्युत गोडबोले यांना द्यायचा आहे असे दिसते. अच्युत गोडबोले यांनी माझं असं काही स्वप्न वगैरे नव्हतं. चांगलं काहीतरी करायचं एवढं मनाशी पक्कं होतं हे सांगितले आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाइतकंच संगीत-साहित्य-कला महत्त्वाचे आहेत, हे त्यांच्या घरातल्या वातावरणामुळे मनावर पक्कं ठसलं होतं. त्यांच्या घरी साहित्यविषयक चर्चा व्हायच्या. पं. भीमसेन जोशी, पं. कुमार गंधर्व, पं. जसराज यांच्यासारखे मोठे गायक घरी यायचे. पाडगावकर, बापट , करंदीकर यांच्या कवितांची वाचनं व्हायची. कलेला अतिशय पोषक असं वातावरण त्यांच्या घरी होतं. त्यामुळे जरी गणितात आयआयटीपर्यंतच्या सर्व परीक्षांमध्ये सर्वोच्च गुण आणि पारितोषिकं मिळाली असली, तरीही फक्त विज्ञान-तंत्रज्ञान या क्षेत्रात काम करायचं, असं कधीच त्यांना वाटलं नव्हतं. म्हणून आजवरचा त्यांचा प्रवास ठरवून असा झालेला नाही. पण आज एकंदरीतच या प्रवासाबद्दल अच्युत गोडबोले यांना खूप छान वाटतं. अच्युत गोडबोले यांच्या घरी समानतेचं वातावरण होतं. भेदाभेद वगैरे कधीच त्यांच्याकडून पाळले गेले नाहीत. अच्युत गोडबोले यांनी आपल्या एका मुलाखतीत म्हटले आहे की, ‘मुळातच मला माणसं एकमेकांना कमी का लेखतात, हेच समजत नाही. समानता ही मुळातच आपल्यात असायला हवी. ती जबरदस्तीने मनाविरुद्ध शिकण्याची गोष्ट नव्हे. ती अंगभूत असेल तरच ती प्रत्यक्ष आयुष्यात अवलंबता येते.’

**३. ज्ञानाचा प्रसार :**

अच्युत गोडबोले याचं लिखाण सर्वंकष तर आहेच पण त्याचबरोबर लेखनाची भाषा ही रसाळ, सहज समजणारी असायला हवी यांवरही त्यांचा कटाक्ष असतो. या बाबतीत त्यांच्यावर बिल ब्रायसन, कार्ल सगान, स्टिफन हॉकिंग अशा अमेरिकन आणि ब्रिटिश लेखकांचा पगडा आहे. लोकांना एखादा विषय गोष्टीरूपात सांगायला त्यांना खूप आवडतं. अर्थात त्यात विषयाचा गाभा आणि त्यातली तत्त्वं महत्त्वाची. त्यात कुठेही तडजोड नको. अच्युत गोडबोले हे मुळात या सार्‍याकडे एका वेगळ्या दृष्टीने पाहतात. ते म्हणतात की, ‘आपण जे काही शिकलोय, पाहिलंय ते लोकांनाही सांगावं ही भावना त्यामागे असते. आपण जे लिहिलंय त्यातून लोकांना त्या विषयात रुची निर्माण होणं, मला महत्त्वाचं वाटतं. त्या विषयाचा मी तज्ज्ञ आहे, असा दावा मी कुठेही करत नाही. जे काही पाहिलंय, शिकलोय ते इतरांबरोबर लेखनरूपात शेयर करावं, असं मात्र आवर्जून वाटतं.’ आपले ज्ञान इतरांना दिल्याने वाढते ही बाब लक्षात घेण्याजोगी आहे.

अच्युत गोडबोले हे व्यावहारिक दृष्टिकोन ठेवून लिहीत नाही. उदाहरणार्थ, 'सीईओ कसे व्हाल' , 'यशस्वी मॅनेजर कसे व्हाल' वगैरे लेखन ते करत नाही. ही पुस्तक लिहिली तर त्यांचा खप प्रचंड होईल, हे त्यांना माहीत आहे पण आधी सांगितल्याप्रमाणे त्यांचा लेखनामागचा उद्देश एखाद्या विषयाबद्दल लोकांच्या मनात आवड निर्माण करणं हा आहे, मग तो विषय कोणताही असो. या सार्‍या लिखाणात त्यांच्या लहानपणीच्या आणि आयआयटीतल्या चर्चा, वाचन, लिखाण यांचा मोठा वाटा आहे. आताही अनेक विषयांवर मनन, चिंतन, वाचन सतत त्याचं चालूच असतं. या सगळ्या विषयांबद्दल त्यांना प्रचंड कुतुहल आहे आणि त्यांच्यावर त्याचं प्रेम आहे. पुस्तक लिहीत असताना 'हे पुस्तक खपेल का', हा विचार ते करत नाही. त्यांना नवनवीन शिकायला, प्रश्न विचारायला आणि वेगवेगळ्या गोष्टींबद्दल जाणून घ्यायला आवडतं. उदाहरणार्थ, मानवी मन ही कधीही कोणाला न दिसणारी, पण प्रचंड गुंतागुंतीची गोष्ट आहे. या गुंतागुतीच्या विषयानं त्यांना आकर्षित केलं. या कुतुहलातून, त्याच्या अभ्यासातून मनोव्यापाराचा वेध घेणारं 'मनात' हे पुस्तक जन्मास आलं. ‘जे जे आपणासी ठावे ते ते इतरांशी सांगावे, शहाणे करून सोडावे सकळ जण’ याप्रमाणे अच्युत गोडबोले यांनी ज्ञानाचा प्रसार केला आहे.

**४. मराठी भाषेस प्राधान्य :**

अच्युत गोडबोले यांचा जगभरात कामानिमित्त जगभरात भरपूर प्रवास झाला. या प्रवासात अनेक गोष्टी त्यांना शिकायला मिळाल्या. त्यामुळे त्यांची दृष्टी व्यापक होत गेली. नोबेल लॉरेट्सना भेटताना आणि पाहताना बोर्डात सोळावे वगैरे असण्याचा अहंभाव त्यांचा गळून पडला. पाय जमिनीवर आले. झापडबंद दृष्टिकोनापासून दूर राहता आलं. सतत नवनवीन शिकायची मूळची वृत्ती त्यांची होतीच.

त्यामुळे कोणत्याही विषयाबद्दल साचेबद्धता त्यांना कधी जाणवली नाही. अच्युत गोडबोले यांनी एका मुलाखतीत आपले विचार असे मांडले आहेत की, 'मी स्वत:ला 'इंट्रिग्रेटर' म्हणवतो कारण मुळात मी क्रियेटिव्ह लिखाण करत नाही. मी कोणी कवी, कथाकार, कादंबरीकार नाही. मी अनेक पुस्तकं वाचतो. मुख्यत: इंग्रजी भाषेतली पुस्तकं वाचतो. हे सारं मराठीत नाही म्हणून ते ज्ञान मराठीत आणण्यावर माझा भर असतो.' मुलांना मराठी माध्यमातून शिकवावं, मात्र त्याच वेळी त्यांना इंग्रजी भाषाही चांगली अवगत होईल, याची काळजी घेतली जावी असे अच्युत गोडबोले यांचे मत आहे. मराठी माध्यमात शिकल्यानं या संस्कृतीशी जवळीक वाढते, असं त्याचं मत आहे. पण इंग्रजी ही आजच्या युगाची ज्ञानभाषा आहे, त्यामुळे ती चांगली बोलता येणं महत्त्वाचं आहे. अच्युत गोडबोले याचं सगळं शालेय शिक्षण मराठी माध्यमातून झालं असल्यामुळे आयआयटीत गेल्यावर त्यांना इंग्रजीवर मेहनत घ्यावी लागली होती. त्यांचा कोणत्याही भाषेला विरोध नाही, पण शिक्षणाच्या बाबतीत मराठी माध्यमाला ते प्राधान्य देतात.

**५. चळवळी समाजासाठी पोषक :**

अच्युत गोडबोले हे चळवळीत फार यशस्वी झाले नाहीत. हे मला जमणार नाही, असं एका क्षणानंतर त्यांना वाटलं. ती त्यांची माघार होती, हे कटू असलं तरीही सत्य आहे आणि अच्युत गोडबोले यांनी ते कबूल केले आहे. मात्र चळवळीमुळे अच्युत गोडबोले यांना विविध अनुभव मिळाले. आदिवासींचं जीवन पाहायला मिळालं. मात्र आताच्या चळवळीची अवस्था पाहिली तर खूप विदारक अशी आहे कारण आजच्या चळवळी ह्या स्वार्थापोटी चालतात. अशा चळवळीना योग्य अशी ध्येय धोरणे नसतात त्यामुळे त्या विफल होताना दिसतात. आज आपल्या देशात मुठभर सरकारी नौक ऱ्या आहेत त्याकरिता विविध संघटनांकडून आरक्षण बाबत आंदोलने होतात परतू मुळात प्रश्न असा आहे की, समाजाने सरकारला हा प्रश्न विचारला पाहिजे की, बेकारीचे प्रमाण वाढतेच का? योग्य दिशेने जाणाऱ्या चळवळी समाजासाठी पोषक असल्याचे अच्युत गोडबोले यांनी आपल्या साहित्यातून सांगितले आहे.

**६. मानसिक आजाराबद्दल सामाजिक जागृती :**

'आशियाना' या शाळेच्या स्थापनेत आणि नंतरची दहा वर्ष त्यांनी भाग घेतला होता. अच्युत गोडबोले यांचे मित्र रवी आणि सुहासिनी या दाम्पत्याचा त्यात सहभाग होता. अच्युत गोडबोले यांना जेव्हा त्यांचा मुलगा निहारच्या आजाराबद्दल कळलं, तेव्हा भारतात हे सर्वच नवीन होतं. अमेरिकेतसुद्धा ऑटिझमबद्दल ठिकठाकच प्रगती झाली होती. निहारला ऑटिझम आहे हे कळलं, त्या दिवशी ब्रिटिश कौन्सिलच्या लायब्ररीत बसून अच्युत गोडबोले यांनी बावीस पुस्तकं वाचून काढली. त्या काळच्या डॉक्टरांनाही, विशेषत: बालरोगतज्ज्ञांनाही याबाबतीत माहीत नव्हतं, मग सर्वसामान्यांना कुठून माहीत असणार? त्यावेळचे बरेचसे पालकही 'अजून लहान आहे, मोठा झाल्यावर होईल ठीक' असा विचार करत. अशावेळी अशा मुलांना एका शाळेद्वारे सपोर्ट सिस्टिम मिळवून देणं, हा विचार 'आशियाना'च्या उभारणीमागे निश्चितच होता.

पालकांच्या आयुष्यातले ताण 'आशियाना' या शाळेद्वारे कमी करता येतील का, हाही विचार अच्युत गोडबोले यांचा होताच पण पहिल्या फटक्यात हा प्रयत्न यशस्वी झाला नाही. अनेक अडचणी उभ्या राहिल्या. कधी जागेचा प्रश्न, कधी पालकांचं असहकार्याचं धोरण, तर कधी आर्थिक प्रश्न. पण अशा अनेक अडचणींवर मात करून स्वत:च्या गुणदोषांसकट 'आशियाना' सुरू झालं. खरंतर अशा शाळांची अनेक पटीनं गरज आहे. कारण पालक तरुण असतात तेव्हा कसंही करून निभावता येतं. पण म्हातारे झाल्यावर काय करायचं? तर अशा मुलांसाठी ट्रस्ट असावेत, काळजी घेणारी माणसं असावीत आणि यात सरकारचा सहभाग असायलाच हवा कारण ही शेवटी आपली माणसं आहेत, आपल्या समाजाचा हिस्सा आहेत. आपल्या मुलाचा आजार लपवून न ठेवता त्यासाठी काय करता येऊ शकेल हे सुशिक्षित सामाजिक नागरिक असल्याचं समाजासाठी एक उत्तम उदाहरण अच्युत गोडबोले यांनी दिले आहे.

**७. समाजासाठी दिशादर्शक :**

अच्युत गोडबोले यांच्यात सुदैवाने थोडीफार असणारी विनोदबुद्धी ही त्यांच्या स्ट्रेस मेनेजमेन्टचं मुख्य साधन आहे. खाणं, चित्रपट, संगीत, कला या साऱ्याची त्यांना मनस्वी आवड आहे. यांमुळे कदाचित त्यांना असंख्य ताणांना तोंड देणं जमलं असावं. आजच्या धकाधकीच्या आणि धावपळीच्या जीवन प्रवासात काम-काम, पैसा-पैसा आणि भौतिक सुखे यात मानव पुरता गुंतलेला आहे, त्याला क्षणभराची देखील उसंत नाही यावर उत्तम उपाय म्हणजे

प्रत्येकांनी आपापल्या आवडी-निवडी जपल्या पाहिजेत. चांगली पुस्तके वाचल्याने दृष्टी व्यापक स्वरुपाची होते आणि ज्ञानाचा कक्षा रुंदावतात. यावरून अच्युत गोडबोले यांच्या अनेक ग्रंथांचं वाचन करून ते समजून घेण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे तसेच त्यांचे साधारणत: ५० पेक्षा अधिक ग्रंथ प्रसिद्ध आहेत व निरंतर काही प्रकाशित होत आहेत. अच्युत गोडबोले यांच्या निवडक ग्रंथाच्या माध्यमातून शैक्षणिक आणि सामाजिक दृष्टिकोनातून साहित्य उपयोगी आहे. अच्युत गोडबोले यांनी विश्लेषित केलेले - मांडलेले अनेक मुद्दे विद्यार्थी, समाज, राष्ट्रभक्ती, समाजशिक्षण, नैतिकता, प्रामाणिकता या अनेक मुद्द्यांच्या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांना व समाजातील व्यक्तींना त्यांचे व्यक्तिमत्व विकसित करण्याच्या दृष्टिकोनातून साहाय्यभूत करणारी आहेत आणि निश्चितच दिशादर्शक आहेत.

**८. सामाजिक स्वास्थ्यासाठी अनुकूल :**

अच्युत गोडबोले यांच्या 'मनात' या ग्रंथात मानसशास्त्रीय विचार व त्याबाबतचा दृष्टिकोन अत्यंत प्रभावी ठरलेला आहे. आज प्रत्येक वाचकाला, प्रत्येक संशोधकाला अच्युत गोडबोले यांचे ग्रंथ वाचल्यानंतर आपण समुपदेशक झालो की काय? अशी भावना मनामध्ये निर्माण होते इतके सविस्तरपणे अगदी समजेल अशा सोप्या भाषेमध्ये अच्युत गोडबोले यांनी साहित्य निर्माण केलेले आहे. त्यातून अनेक मानसशास्त्रीय दृष्टिकोन जगासमोर आणले मन:स्थिती कशा पद्धतीने बदलते? मानसिक परिस्थिती कशा पद्धतीने घडून येते? याचे चित्र व्यक्त करत असताना त्यांचे मानसशास्त्रीय विचार प्रकर्षाने मांडले आहेत. २१ व्या शतकामध्ये मनुष्य हा कशा पद्धतीने मनोरुग्न अवस्थेकडे जात आहे? त्याची काय कारणे कोणती आहेत? त्याच्यावर आपण कुठल्या पद्धतीने उपचार करू शकतो? यावर परिणामकारक पद्धतीचे विचार अच्युत गोडबोले यांनी व्यक्त केलेले आहेत. या संदर्भात असलेले त्यांचे ग्रंथ प्रामुख्याने 'मनकल्लोळ' चे भाग(१ व २) 'सायकोथेरपीज, मनात, ऑटिझम, अनर्थ, डिप्रेशन, गुलाम' यासारख्या ग्रंथाच्या माध्यमातून मानसशास्त्रीय विचारांचा उलगडा होतो. हे विचार अत्यंत प्रभावीपणे संपूर्ण शिक्षण व्यवस्थेला, समाज व्यवस्थेला, युवकांना, वृद्धांना, नागरिकांना, वाचकाला लागू पडणारे आहेत.

**९. मानवतावाद :**

अभिव्यक्ती म्हणजे स्वत:चे गुण एक किंवा अधिक माध्यमाद्वारे सादर करणे किंवा प्रकट करणे होय. येथे गुणामध्ये स्वत:च्या भावना, विचार, संवेदना, क्षमता, कला प्रकट किंवा व्यक्त केल्या जाऊ शकतात. बौद्ध, महावीर, येशू, म. गांधी. म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेकर अशा अनेक विचारवंतांनी 'ग्रंथगत अभिव्यक्तीने' समाजाला शोषण मुक्त करण्याचं काम केलं आहे. फ्रान्सचा क्रांतिकारी लेखक वॉल्टियर म्हणतो, 'एकवेळ मी तुमच्या मताशी सहमत असणार नाही; परंतु तुमच्या अभिव्यक्तीचा, तिच्या सामर्थ्याचा, स्वातंत्र्याचा शेवटपर्यंत सन्मान करेन.' कारण अभिव्यक्ती ही वैश्विक स्वरुपाची असण्याचे प्रमुख कारण म्हणजे त्यात खरा मानवतावाद असतो. अभिव्यक्तीला मानवतेची दयनीय अवस्था, दु:ख, वेदना ह्या आपल्याच वाटतात. प्रत्येक व्यक्तीची एक स्वतंत्र अशी विचारशक्ती असते आणि त्यातूनच एक विभिन्न प्रकारची अभिव्यक्ती जोपासली जाते त्याचा संगोपन केलं जातं आणि त्यातूनच एक अभिव्यक्ती सौंदर्य खुलत असतं याला अच्युत गोडबोले देखील अपवाद नाहीत. त्यांच्या साहित्याचा आढावा घेत असताना त्यांच्या लेखणीच्या संदर्भात विविध प्रकारच्या अभिव्यक्ती वाचकाच्या समोर येत असतात. मानवतावाद हा शिक्षणातून रुजविला गेला तर सामाजिक स्वास्थ्य योग्य पद्धतीने राखले जाईल.

**१०. नैतिक मूल्याची शिकवण :**

शिक्षणाचा मुख्य उद्देश हा मनुष्यामध्ये नीतिमत्ता आणि नैतिकता विकसित करणे हा असतो या अनुषंगाने अच्युत गोडबोले यांचा 'मुसाफिर' हा ग्रंथ अभ्यासत असताना पदोपदी आपणास याची अनुभूती येते की, प्रत्येकाजवळ एक स्वत:ची नीतिमत्ता व नैतिकता असली पाहिजे आणि तशा पद्धतीचे मूल्य आपण जोपासले पाहिजेत. अच्युत गोडबोले यांच्या आदिवासी चळवळीबद्दल त्यांचे असलेले योगदान आणि त्यांच्याबद्दल असलेली तळमळ आणि जाणीव याचे चित्र आपणास दिसून येते. आपण एका उच्च संस्थेमध्ये आयआयटी सारख शिक्षण घेऊन देखील आपल्या देशातील सामाजिक आणि सांस्कृतिक प्रश्नाकडे लक्ष दिले पाहिजे या उर्मीने शहाद्या या ठिकाणी जाऊन आदिवासी समूहाकरिता त्यांनी काम केलं. त्यांचे दैनंदिन जीवन अच्युत गोडबोले यांनी समजून घेतले, आदिवासींमध्ये मोठ्या प्रमाणावर

जमीनदाराचं प्रमाण अधिक आहे त्यामुळे इतर आदिवासी समाजाचे अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. यात त्यांचा उदरनिर्वाहाचा मुख्य प्रश्न निर्माण झालेला आहे. या समस्येचे निराकरण करण्याच्या दृष्टिकोनातून अच्युत गोडबोले यांनी एक आंदोलन उभे केलं आणि या आंदोलनाचा एक भाग म्हणून त्यांना दहा दिवस तुरुंगवास भोगावा लागला म्हणजेच उच्च विद्याविभूषीत होऊन देखील आपण आपली सामाजिक बांधिलकी, नैतिकता, विचारातील प्रामाणिकपणा हा सोडला नाही पाहिजे याची अनुभूती या प्रसंगावरून येते.

**उपसंहार :**

'मी निसर्गाला देव आणि माणुसकीला धर्म मानतो' असे म्हणणाऱ्या अच्युत गोडबोले यांची सामाजिक विचारसरणी अत्यंत प्रेरणादायी आहे. उच्च विद्याविभूषीत होऊन देखील व्यक्तींनी आपली नैतिकता, विचारातील प्रामाणिकपणा हा सोडला नाही पाहिजे याची अनुभूती त्यांच्या विचारातून येते. अभिव्यक्ती ही वैश्विक स्वरुपाची असण्याचे प्रमुख कारण म्हणजे त्यात खरा मानवतावाद असतो. अभिव्यक्तीला मानवतेची दयनीय अवस्था, दु:ख, वेदना ह्या आपल्याच वाटतात. प्रत्येक व्यक्तीची एक स्वतंत्र अशी विचारशक्ती असते आणि त्यातूनच एक विभिन्न प्रकारची अभिव्यक्ती जोपासली जाते, त्याचे संगोपन केलं जातं आणि त्यातूनच एक अभिव्यक्ती सौंदर्य खुलत असतं याला अच्युत गोडबोले देखील अपवाद नाहीत. अच्युत गोडबोले यांनी विश्लेषित केलेले - मांडलेले अनेक मुद्दे विद्यार्थी, समाज, राष्ट्रभक्ती, समाजशिक्षण, नैतिकता, प्रामाणिकता या अनेक मुद्द्यांच्या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांना व समाजातील व्यक्तींना त्यांचे व्यक्तिमत्व विकसित करण्याच्या दृष्टिकोनातून साहाय्यभूत करणारी आहेत आणि निश्चितच दिशादर्शक आहेत. मानवतावाद हा शिक्षणातून रुजविला गेला तर सामाजिक स्वास्थ्य योग्य पद्धतीने राखले जाईल. आपले ज्ञान इतरांना दिल्याने वाढते ही बाब लक्षात घेण्याजोगी आहे. मानवी मन ही कधीही कोणाला न दिसणारी, पण प्रचंड गुंतागुंतीची गोष्ट आहे. या गुंतागुतीच्या विषयानं अच्युत गोडबोले यांना आर्कषित केलं. या कुतुहलातून, त्याच्या अभ्यासातून मनोव्यापाराचा वेध घेणारं 'मनात' हे अच्युत गोडबोले याचं पुस्तक जन्मास आलं. या पुस्तक रूपाने त्यांनी समाजाला मानसशास्त्राची ओळख करून दिली. 'जे जे आपणासी ठावे ते ते इतरांशी सांगावे, शहाणे करून सोडावे सकळ जण' याप्रमाणे अच्युत गोडबोले यांनी ज्ञानाचा प्रसार केला आहे.

**संदर्भ सूची :**


१. गोडबोले, अच्युत (२०२२), 'थैमान चंगळवादाचे', पुणे, साधना प्रकाशन
२. देशमुख,दीपा (२०१९), 'समृद्ध आयुष्याचा मंत्र देणारा मुसाफिर अच्युत गोडबोले' पुणे, मनोविकास प्रकाशन
३. गोडबोले, अच्युत (२००७), 'किमयागार', पुणे, मनोविकास प्रकाशन
४. गोडबोले, अच्युत (२०१७), 'मनकल्लोळ', पुणे, मधुश्री प्रकाशन
५. गोडबोले, अच्युत (२०२०), 'मनात', पुणे, मधुश्री प्रकाशन
६. गोडबोले, अच्युत (२०२१), 'अनर्थ', पुणे, मनोविकास प्रकाशन
७. गोडबोले, अच्युत (२०१२), 'मुसाफिर', पुणे, मनोविकास प्रकाशन
८. गोडबोले, अच्युत (२०१९), 'डिप्रेशन', पुणे, मनोविकास प्रकाशन
९. https://divyamarathi.bhaskar.com/local/maharashtra/aurangabad/jalna/news/happiness-depends-on-the-difference-between-expectations-and-reality-says-achyut-godbole-129612106.html
१०. https://www.lokmat.com/maharashtra/need-change-development-country-achyut-godbole/
११. https://www.maayboli.com/node/54480
१२. https://www.doubtnut.com/qna/647975820
१३. https://payalbooks.com/products/arthat-by-achyut-godbole